Azadi Ka Amrit Mahotsav

# रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

स्थापना महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७/२०२१ दिनांक २३ मार्च, २०२१

RATAN TATA MAHARASHTRA STATE SKILLS UNIVERSITY


जा. क्र.र.टा.म.रा.कौ.वि./लेखा परीक्षण/२०२४-२५/७४१ दिनांक : १२/१२/२०२४

## मुदतवाढ दरपत्रक सूचना

विषय: रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे सन २०२४-२५ करिता वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल ची नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ : दरपत्रक क्र. र.टा.म.रा.कौ. वि./लेखा परीक्षण/२०२४-२५/११७६ दिनांक : ०२.१२.२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार दिनांक ०२.१२.२०२४ रोजी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे सन २०२४-२५ करिता वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल नियुक्ती करण्यासाठी दरपत्रकाबाबतची सूचना विद्यापीठाच्या नोटिस बोर्डवर आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तरी सदर दरपत्रक सुचनेस आता मुदत वाढ करण्यात येत आहे. उपरोक्त विषयासंदर्भातील दरपत्रक हे मा. कुलसचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई यांचे नावे दि.२३/१२/२०२४ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील अशा पद्धतीने पाठविण्यात यावीत, उशिरा प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे सन २०२४-२५ करिता वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल नियुक्ती करण्यासाठी दरपत्रक तपशील प्रपत्र १ व २ मध्ये दिले आहे.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ मुंबई ४०० ००१

(श्री.प्रभाकर सावंत)
वित्त व लेखा अधिकारी
र. टा. म.रा.कौ. वी., मुंबई


पहिला मजला, एल्फिस्टन हायस्कूल, ३ महापालिका मार्ग, मेट्रो चौक, मुंबई - ४०० ००१.

Email id: contact@mssu.ac.in

# Ratan Tata Maharashtra State Skills University

Annexure - I

## ELIGIBILITY CRITERIA

1. Firm should be existence for at least 10 years.
2. Firm should be CAG Empaneled
3. Firm should be Peer Reviewed.
4. Firm should have conducted audit of minimum 2 education institutes.

## SCOPE AND EXTENT OF COVERAGE OF AUDIT

1. To review and evaluate internal control systems and procedures to determine reliability and integrity of information and documents.
2. To ensure that the Maharashtra State Skills University maintains proper accounting records as required by Act- and follows prescribed accounting standards and practices and policies consistently.
3. To assess adequacy of systems and procedures for procurement, obtaining sanction for disbursement and utilization of resources.
4. To ensure compliance of statutory laws, rules and regulations.
5. To review corporate Governance practices.
6. Evaluation of performance management system with reference to yearly plan and budget.
7. To assess the adequacy of the internal financial control systems and procedures for safeguarding the interest of the Maharashtra State Skills University, detecting fraud or irregularities, and safeguarding the assets of the Maharashtra State Skills University.
8. To review Internal Financial control on financial reporting.
9. To assist / guide MSSU for compliance in CAG Audit.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ मुंबई ४००००१

Annexure-II

## परिशिष्ट - क
## अटी व शर्ती

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण व तदनुषंगाने करावयाची कार्यवाही सहकारी अधिनियम, नियम व कार्यालयीन परिपत्रकीय सुचनांप्रमाणे निर्धारीत मुदतीत विहीत पद्धतीने पूर्ण होणेसाठी लेखापरीक्षक नामतालिकेवर नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांनी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करताना खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१) 'अ' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या संस्थांनी, 'अ' सूचीमध्ये समाविष्ट असणाऱ्या लेखापरीक्षकांचीच नेमणूक करावयाची आहे.

२) 'अ' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणारे लेखापरीक्षक 'अ' 'ब' 'क' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षणास पात्र राहतील.

३) 'अ' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या संस्थांपैकी i) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई, ii) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, iii) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस पणन महासंघ व iv) महाराष्ट्र राज्य सहकारी दुध संघ (महानंदा) या संस्थांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 'अ' सुचीत समाविष्ट असलेले **सनदी लेखापाल फर्म, सनदी लेखापाल व सहनिबंधक पात्र असतील.**

४) 'ब' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या संस्थांनी, 'अ' किंवा 'ब' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या लेखापरीक्षकांचीच नेमणूक करावयाची आहे.

५) 'ब' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणारे लेखापरीक्षक 'ब' किंवा 'क' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षणास पात्र राहतील. म्हणजेच 'अ' वर्गीकरणातील संस्थांचे लेखापरीक्षणास पात्र राहणार नाहीत.

६) 'ब' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या रुपये २५ कोटी पेक्षा कमी ठेवी असणाऱ्या नागरी सहकारी बँका तसेच रुपये १० कोटी व त्यापेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांचे व ग्रामीण बिगर कृषी पतसंस्थांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 'ब' सुचीत समाविष्ट असलेले **सनदी लेखापाल व विशेष लेखापरीक्षक वर्ग २ पात्र असतील**. लेखापरीक्षक श्रेणी १ व प्रमाणीत लेखापरीक्षक पात्र राहणार नाहीत.

७) 'क' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या संस्थां, 'अ' किंवा 'ब' किंवा 'क' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या लेखापरीक्षकांची नेमणूक करू शकतील.

८) 'क' वर्गीकरणामध्ये समाविष्ट असणारे लेखापरीक्षक केवळ 'क' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षण करण्यास पात्र राहतील. म्हणजेच 'क' सुचीतील लेखापरीक्षक 'अ' किंवा 'ब' वर्गीकरणात समाविष्ट असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षण करू शकणार नाहीत.

९) प्रत्येक संस्थेने आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत (Annual General Meeting) उपरोक्त नमूद केलेल्या सुचीनुसार लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या फर्मची नेमणूक करणे आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नेमणूक केलेल्या लेखापालाच्या फर्मचे/लेखापरीक्षांचे नाव आणि संस्थेच्या लेख्याचे लेखापरीक्षण करण्यासाठीची त्याची लेखी संमती हे विवरणपत्राच्या स्वरूपात संबंधीत संस्थेच्या निबंधकाकडे सादर करणे आवश्यक राहील तसेच संबंधीत लेखापरीक्षकाने सदर ठरावाची प्रत व आपले संमतीपत्र वर नमूद केलेल्या मुदतीत संबंधीत संस्थेच्या निबंधकास व सदर संस्था ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना पोहोच होईल असे पाहावे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ मुंबई ४००००१

१०) संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीमध्ये त्याच लेखापरीक्षकाची नेमणूक लागोपाठ ३ वर्षाहून अधिक कालावधीसाठी करता येणार नाही याची दक्षता संस्था आणि लेखापरीक्षक यांनी घ्यावयाची आहे.

११) कोणत्याही लेखापरीक्षकास रुपये १ लाखापेक्षा कमी भरणा झालेले भागभांडवल असणाऱ्या संस्था वगळता, एका वित्तीय वर्षात लेखापरीक्षण करण्यासाठी एकूण २० पेक्षा अधिक संस्थांचे लेखापरीक्षण स्विकारता येणार नाही.

१२) सहकारी संस्थांचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती मिळालेल्या लेखापरीक्षकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ८१ व त्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदीनुसार व ऑडिटींग स्टॅण्डर्डनुसार लेखापरीक्षण पूर्ण करावयाचे आहे. प्रत्येक लेखापरीक्षकाने संस्थेच्या हातावरील रोख शिल्लक ही आरंभीची रोख शिल्लक अचानकपणे व संस्थेस कोणतीही पूर्वकल्पना न देता तपासावी. तसेच लेखापरीक्षकांच्या अहवालात खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक राहील.

(अ) लेखापरीक्षकाच्या अहवालात निदर्शनास आलेले दोष किंवा अनियमितता यांचा सर्व तपशील असेल आणि आर्थिक अनियमितता व निधीचा दुर्विनियोग किंवा अपहार किंवा लबाडी याबाबतीत, लेखापरीक्षक अन्वेषण करील आणि त्या बाबतची कार्यपद्धती, गुंतलेली रक्कम व त्यास जबाबदार व्यक्ती याचा अहवाल देईल आणि निधीचा असा दुर्विनियोग किंवा अपहार किंवा लबाडी याबाबत आवश्यक त्या सर्व पुराव्यांसह समितीचे पदाधिकारी, सदस्य, संस्थेचे अधिकारी, कर्मचारी किंवा यथास्थिती, कोणतीही अन्य व्यक्ती यांची जबाबदारी निश्चित करेल.

(ब) लेखापरीक्षकाने संस्थेचा नफा वा तोटा यावरील तद्नुरूप परिणामांसह अहवालात लेख्यांची अनियमितता आणि त्यांच्या वित्तीय विवरणपत्रांवरील अपेक्षित भाराचे तपशीलवार विवेचन करावे. संस्थेच्या नफ्यावर परिणाम करणाऱ्या बाबी लेखापरीक्षण अहवाल भाग १ मध्ये लिहून त्यांचा नफयावर किती परिणाम झाला, संस्थेस नफा आहे किंवा कसे व तो किती याबाबत लेखापरीक्षण दाखल्यात नमूद करावे. याबाबत ऑडिटींग स्टॅण्डर्ड नं.७०० चे उल्लंघन होणार नाही हे लेखापरीक्षकाने पहावे.

(क) लेखापरीक्षकांनी संस्थेच्या समिती व उपसमित्या यांच्या कामकाजाची तपासणी करून कोणतीही अनियमितता किंवा उल्लंघन निदर्शनास आल्यास किंवा कळविण्यात आल्यास, अशा अनियमितता किंवा उल्लंघन याबद्दल जबाबदारी यथोचित रित्या निश्चित करावी.

(ड) लेखापरीक्षकाने संस्थेच्या मिळालेल्या माहितीवरून स्वत:चे अनुभव व ज्ञानाप्रमाणे आणि शासनाची व निबंधकांची परिपत्रके, सूचना, संस्थेचे पोटनियम, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व त्याखालील नियम याचा अभ्यास करून संस्थेचे लेखापरीक्षण करावे व त्यानुसार सर्व बाबींचा उल्लेख लेखापरीक्षण अहवालात करावा.

(इ) लेखापरीक्षकाने संस्थेचे वार्षिक हिशोब पत्रके तपासून ही पत्रके, संस्थेचे दप्तर कागदपत्रे व संस्थेचे सभा वृत्तांत इ. बाबींशी जुळतात किंवा नाही याची खात्री करावी व लेखापरीक्षण अहवालात तसा स्पष्ट उल्लेख करावा.

(फ) लेखापरीक्षण अहवाल पुढील अनुक्रमानुसार सादर करणे आवश्यक आहे. संस्थेस लेखापरीक्षण अहवाल अग्रेषित केलेले पत्र, अनुक्रमणिका, संस्थेचा लेखापरीक्षक नेमणूकीचा ठराव, त्यानुसार दिलेले लेखापरीक्षकाचे संमतीपत्राची प्रत, नमुना क्र.१, संस्थेच्या प्रकारानुसार आवश्यक नमुना, कलम ८१ (२) नुसार १ ते ९ बाबींचे विवेचन, भाग 'अ' 'ब' 'क' मधील विवेचन, लेखापरीक्षकांचा दाखला (बँकांसाठी एन-१ व इतर संस्थांसाठी एन-२ या नमुन्यात) व १ ते ६ परिशिष्टे, आर्थिक पत्रके व त्या अनुषंगिक याद्या, लेखापरीक्षण वर्गवारीचा गुणतक्ता व बँकेचे /

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मुंबई ४००००१

पतसंस्थेचे बाबतीत N. P. A. प्रमाणपत्र, बँकेने / पतसंस्थेने दाखविलेला एन.पी.ए. चुकीचा असेल व काही खाती एन.पी.ए. मध्ये असताना पी.ए. मध्ये दाखविली असतील तर खालील नमुन्यातील तक्ता जोडावा.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | येणे बाकी | येणे व्याज | लेखापरीक्षकाचे मतानुसार वर्गीकरण | बँकेने / पतसंस्थेने केलेले वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

| लेखापरीक्षकाचे मतानुसार आवश्यक तरतूद | बँकेने / पतसंस्थेने केलेली तरतूद | कमी / जादा तरतूद | लेखापरीक्षकाचे मते दखवावयाचे थकव्याज | बँकेने / पतसंस्थेने दाखविलेले थकव्याज | कमी / जादा तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

लॉंग फॉर्म ऑडीट रिपोर्ट (LFAR) व रिझर्व बँक/ नाबार्ड/ निबंधकांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे आदेशीत केलेल्या बाबी अनुक्रमे जोडाव्यात. 'अ' भागात संस्थेचे गंभीर स्वरूपाचे दोष, आर्थिक अनियमितता, प्रशासकीय/ फौजदारी कारवाई करणे आवश्यक असणाऱ्या बाबींचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१३) लेखापरीक्षक आपल्या लेखापरीक्षण अहवालात, कोणतीही व्यक्ती, लेख्यासंबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल किंवा इतर कोणत्याही अपराधाबद्दल भारतीय दंड संहितेनुसार (IPC) दोषी आहे, या निष्कर्षा पर्यंत आला असेल त्याबाबतीत त्याने, त्याचा लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे विनिर्दिष्ट अहवाल (Specific Report) दाखल करणे व निबंधकाची लेखी परवानगी प्राप्त केल्यानंतर अपराधाचा प्रथम माहिती अहवाल (FIR) संबंधित पोलिस ठाण्यात दाखल करणे बंधनकारक राहील, जो लेखापरीक्षक अपराधाचा प्रथममाहिती अहवाल (FIR) दाखल करण्यास कसूर करील तो अनर्हतेस पात्र ठरेल आणि त्याचे नाव लेखापरीक्षकांच्या नामतालिकेतून काढून टाकण्यास पात्र ठरेल. तसेच निबंधकास योग्य वाटेल अशा कोणत्याही अन्य कारवाईस देखील पात्र ठरेल.

१४) लेखापरीक्षकेच्या निष्कर्षावरून, लेखापरीक्षकाला असे दिसून आले की, समितीचे कोणतेही सदस्य किंवा संस्थेचे अधिकारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांनी केलेल्या आर्थिक व प्रशासकीय अनियमिततांच्या धडधडीत बाबींमुळे संस्थेला तोटा आला असेल तेव्हा त्याने, विशेष अहवाल तयार करून आपल्या लेखापरीक्षण अहवालासह निबंधकाकडे सादर करणे बंधनकारक राहील. असा विशेष अहवाल दाखल न करण्याची बाब ही त्याच्या कर्तव्यातील निष्काळजीपणा या सदरात जमा होईल आणि तो लेखापरीक्षक म्हणून नियुक्तीसाठी किंवा निबंधकास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही कारवाईस पात्र ठरेल.

१५) लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण अहवाल, लेखापरीक्षण पूर्ण झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची सूचना (नोटीस) देण्यापूर्वी खालील कार्यालयांना सादर करावा.

१) संस्था, २) संबंधित निबंधक, ३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, ४) ज्या वित्तीय संस्थांकडून कर्जे घेतले असतील त्या वित्तीय संस्थेला, ५) रूपये ५ लाखांपेक्षा जास्त भागभांडवल असेल तर सचिव तथा सहनिबंधक (लेखापरीक्षण), राज्यस्तरीय लेखा समिती, महाराष्ट्र राज्य, ५ बी. जे. रोड, पुणे, ६) संस्थेचे कार्यक्षेत्र काहीही असले तरी संस्थेचे मुख्यालय ज्या जिल्ह्यात आहे, ते जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक.

१६) लेखापरीक्षकाने आपला अहवाल सादर केल्यानंतर अहवालात नमूद केलेल्या दोषांची संस्थेमार्फत संपूर्ण दुरूस्ती करेपर्यंत संस्थेच्या दुरूस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला व संस्थेला आपला अहवाल सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची जबाबदारी राहील.

१७) अंतर्गत तसेच सतत व समवर्ती लेखापरीक्षण करणारे लेखापरीक्षक त्याच संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण करण्यास पात्र राहणार नाहीत.

१८) संस्थेकडून कर्ज घेणारे लेखापरीक्षक त्या संस्थेचे लेखापरीक्षण करण्यास पात्र राहणारा नाहीत.

१९) नामिकेवरील लेखापरीक्षक किंवा त्यांचे नातेवाईक ज्या संस्थेचे संचालक असतील त्या संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण करण्यास पात्र राहणार नाहीत, नातेवाईकांचा तपशिल कायदा कलम ७५ (२) मध्ये दिला आहे.

२०) अनुक्रमांक १५ मध्ये नमूद केल्यानुसार जे लेखापरीक्षक लेखापरीक्षण अहवाल वेळेत सादर करणार नाहित ते नामिकेवर राहण्यास पात्र राहणार नाहीत.

२१) लेखापरीक्षक जर त्या संस्थेचा आजी / माजी कर्मचारी असेल तर तो लेखापरीक्षक त्या संस्थेच्या लेखापरीक्षणास पात्र असणार नाही.

२२) सहकार खात्याचे लेखापरीक्षकांच्या बाबतीत लेखापरीक्षकाने कुठल्याही संस्थेचे लेखापरीक्षण केले तरी तो ज्या आस्थापनेवर कार्यरत आहे त्या आस्थापनेच्या लेखापरीक्षण शुल्काच्या शिर्षाखालीच लेखापरीक्षण शुल्क भरुन घ्यावे.

२३) लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण अहवालाचा भाग अ, लेखापरीक्षकाचा दाखला व लेखापरीक्षित आर्थिक पत्रके सहकार खात्याच्या वेबसाईवर अपलोड करावीत.

२४) लेखापरीक्षकांनी संस्थेचे लेखापरीक्षण अहवाल सादर करताना लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या संस्था व्यवहारातील गंभीर बाबी, अनियमितता, अफरातफर, गैरव्यवहार, गैरविनियोग व संस्थेची आर्थिक व सांपत्तिक स्थिती इ. बाबींचा संक्षीप्त तपशीलाचा गोषवारा (Executive Summery) सादर करावा. संक्षीप्त गोषवाऱ्यामध्ये संस्थेने केलेल्या चांगल्या तसेच ज्या बाबींमध्ये सुधारणा करावयाची आवश्यकता आहे, त्या बाबींचा समावेश करावा. संक्षीप्त तपशीलाचा गोषवारा (Executive Summery) शिवाय लेखापरीक्षण अहवाल स्विकृत केला जाणार नाही.

२५) लेखापरीक्षकांनी जर लेखापरीक्षणात निष्काळजीपणा केला, गंभीर बाबी, अपहार, गैरव्यवहार, फसवणूक, लबाडी इ. बाबी लेखापरीक्षण अहवालात नमूद करण्याचे टाळले आणि अशा बाबी चाचणी लेखापरीक्षण / फिरतेपथक तपासणी / विशेष लेखापरीक्षण / फेरलेखापरीक्षणाचे वेळी निदर्शनास आल्यास संबंधीत मूळ लेखापरीक्षकांविरुद्ध अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल.

२६) वरील नमूद वर्गीकरणानुसार संस्थेने त्यांचे वर्गासाठी उपलब्ध असणाऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती न करता कनिष्ट वर्गाच्या लेखापरीक्षकांची नियुक्ती केल्यास सदर बाब संबंधीत लेखापरीक्षकाने निबंधकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

उपरोक्त संस्था व लेखापरीक्षक वर्गीकरण आणि अटी व शर्ती विचारात घेवूनच संस्थांनी त्यांचे वर्गीकरणानुसार लेखापरीक्षकांची नियुक्ती करावयाची आहे.